पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १७५**

(सभावृत्तांत)

**दिनांक – १०/०६/२०२०** **वेळ – दु. ०२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा **बुधवार दि.१०/०६/२०२०** रोजी दु.०२.३० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

**१. मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे – सभापती**
२. मा.शितल ऊर्फ विजय गोरख शिंदे
३. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
४. मा.पंकज दत्तात्रय भालेकर
५. मा.कलाटे राहुल तानाजी
६. मा.बुर्डे सुवर्णा विकास
७. मा.फुगे भिमाबाई पोपट
८. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
९. मा.सुलक्षणा राजू धर

या शिवाय मा.श्रावण हर्डीकर – आयुक्त, मा.पाटील - अति.आयुक्त (१), मा.पवार – अति.आयुक्त (२), मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.पाटील – शहर अभियंता, मा.कुंभोजकर – मुख्य लेखापरिक्षक, मा.डॉ.रॉय – आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.जोशी - सहाय्यक आयुक्त, मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.साळवे – अति.आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठाता YCMH, मा.तांबे, मा.चव्हाण, मा.गलबले – कार्यकारी अभियंता, मा.जगताप – कामगार कल्याण अधिकारी, मा.गवळी – पी.एम.पी.एम.एल. हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले -**

विषय क्र.०७) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या बालनगरी इमारतीमध्ये "कोरोना" (COVID 19) केअर सेंटर उभारणे व अनुषंगिक कामे करणे कामासाठी वास्तुविशारद यांची नेमणूक करणेबाबत.

विषय क्र.०८) मनपाचे प्राथमिक व माध्यमिक विद्यार्थ्यांचे शिक्षणाकरिता FM Broadcasting यंत्रणा सुरु करणेबाबत.

विषय क्र.०९) शेतक-यांमार्फत थेट भाजीपाला व फळे विक्रीस मान्यता देणेबाबत – मा.शितल शिंदे, मा.राहुल कलाटे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१०) सल्लागार नेमणेबाबत – मा.राहुल कलाटे, मा.शितल शिंदे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक ०३/०६/२०२० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१७४) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ७१५० विषय क्रमांक – १

दिनांक – १०/०६/२०२० विभाग – माहिती व तंत्रज्ञान

सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांचे पत्र क्र.मातंवि/११/कावि/७५/२०२०, दि.०८/०५/२०२०

मा.मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजना विषयक माहीती नागरिकांना देणेकामी पेड फेसबुक सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत मनपा संकेतस्थळावर कोटेशन नोटीस क्र.०१/२०२०-२१ दि.२८/०४/२०२० रोजी प्रसिद्ध करुन पुरवठा धारकांकडुन सिलबंद लिफाफ्यात दरपत्रके मागविणेत आलेली होती. विषयांकीत कामकाजासाठी एकूण ३ दर पत्रके प्राप्त झालेले होते. प्राप्त दर पत्रकांपैकी लघुत्तम दरधारक मे.डिझायर ग्राफिक्स यांचे र.रु.२,८३,५५४/- (अक्षरी र.रु.दोन लाख त्र्याऐंशी हजार पाचशे चौप्पन्न फक्त) सर्व करांसहीत असे दर प्राप्त झाले असून ते अंदाजपत्रकीय दरांपेक्षा २.२२ टक्के कमी आहेत. प्राप्त लघुत्तम दरांचा विचार करता र.रू.२,८३,५५४/- सर्व करांसहीत इतका खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार संबधितांना आदेश क्र.मातवि/११/ कावि/७४/२०२० दि.०५/०५/२०२० अन्वये कामकाज आदेश निर्गत करणेत आलेला आहे. मे.डिझायर ग्राफिक्स यांना कोटेशन नोटीस व कामकाज करारनामा यांस अनुसरून कोविड १९ बाबत नागरीकांमध्ये जागरुकता निर्माण करणे, सामाजीक अंतर, कंटेनमेंट झोन बाबतच्या नियमांचे काटेकोर पालन करणे बाबत सुचना देणे, समाजातील विविध स्तरावरील अनुभवी व तज्ञ लोकांचे माध्यामातुन नागरींकाना मार्गदर्शन करणे, कोविड १९ बाबत नागरीकांनी काय करावे व काय करु नये याबाबतची माहीती देणे, मनपा मार्फत विकसित करणेत आलेल्या कोविड १९ डॅशबोर्ड बाबतची माहिती नागरीकांना रोजचे रोज उपलब्घ करुन देणे, कंटेनमेंट झोनच्या सिमांबाबतचे नकाशे प्रसिद्ध करणे, इत्यादि बाबतची माहीती व कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजना विषयक माहीती, मा. महापौर, मा. आयुक्त सो., इतर अधिकारी व पदाधिकारी यांची नागरीकांसोबत लाईव्ह चर्चा जास्तीत जास्त नागरीकांपर्यंत पोहचविणे इत्यादि कामी आदेश दिनांका पासुन दोन महिने पेड फेसबुक सेवा तात्काळ उपलब्ध करणेचे कामकाज देण्यास तसेच त्यांचेसोबत केलेल्या कामाचा करारनामा र.रू.२,८३,५५४/- सर्व करांसहीत इतक्या येणा-या खर्चास व विषयांकीत कामकाजासाठी येणारा खर्च

माहिती व तंत्रज्ञान विभागाचे “ई-गव्हर्नन्स” या लेखाशिर्षावरून खर्ची टाकणे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम सुधारित कलम ७३ (क) नुसार अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७१५१ विषय क्रमांक – २
दिनांक – १०/०६/२०२० विभाग – लेखा
सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.लेखा/०३/कावि/८६/२०२०, दि.२७/०५/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सन २०२०-२१ चे अंदाजपत्रकात पीएमपीएमएल निधी या लेखाशिर्षावर र.रु.२४४ कोटी (अक्षरी र.रु.दोनशे चव्वेचाळीस कोटी फक्त) तरतूद करणेत आली असून यामध्ये संचलनतूट १३३.५८ कोटी विविधप्रकारचे पासेस र.रु.१४.५९ कोटी बसेस खरेदी र.रु.३५.८३ कोटी व ई बस सबसिडी ६० कोटी असा अपेक्षीत खर्च गृहीत धरण्यात आलेला आहे. सदर रकमेतून प्रतिमहा रक्कम रुपये ९ कोटी संचलनतूट व सवलतीचे पासेस पोटी र.रु.१.५० कोटी असे एकूण र.रु.१०.५० कोटी (अक्षरी र.रु.दहा कोटी पन्नास लाख फक्त) सन २०१९-२० च्या अंदाजित संचलन तूटीचे लेखापरिक्षण होऊन तूट कायम होईपर्यंत माहे मे २०२० चे अदा करावयाचे असल्याने व सदरची बाब आर्थिक स्वरुपाची असल्याने मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७१५२ विषय क्रमांक – ३
दिनांक – १०/०६/२०२० विभाग – स्व.म.अ.कक्ष
सुचक – मा. शितल शिंदे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे
संदर्भ – मा.आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांचे पत्र क्र.स्वमअक/२/कावि/२३/२०२०, दि.०३/०६/२०२०

मा.आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

नागरीकांमध्ये स्वच्छ सर्वेक्षण २०२० बाबत जनजागृती होणेकामी वॉलसाईन, होर्डींग्ज व स्टीकर्स इत्यादीद्वारे जनजागृती करणेत आलेली आहे. तथापी आधिक प्रभावीपणे नागरीकांना अवाहन करण्यात आलेले आहे. त्या अनुशंगाने म.न.पा. च्या ८ क्षेत्रीय कार्यालयानुसार त्यांचे कार्यक्षेत्रामध्ये ध्वनीक्षेपकाच्या सहाय्याने रीक्षाद्वारे जनजागृती करण्यात आलेली आहे. याकरीता आगाऊ र.रु.१,६०,०००/- (अक्षरीर.रु.एक लाख साठ हजार फक्त) इतकी रक्कम मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे नांवे घेणेत आलेली आहे. तसेच सदरची रक्कम ८ क्षेत्रीय कार्यालय निहाय प्रत्येकी र.रु.२०,०००/- याप्रमाणे एकुण र.रु.१,६०,०००/- इतकी देण्यात आलेली आहे. सदरचा खर्च “आरोग्य विषयक शासकीय योजनांची अंमलबजावणी व आरोग्य विषयक जनजागृती” या लेखाशीर्षामधुन करणेकामी व आगाऊ स्वरुपात रक्कम घेणेकामी तसेच मा.स्थायी समितीची कार्योत्तर मान्यता घेणेकामी मा.आयुक्त सो. यांनी दि.१३/०१/२०२० रोजीचे आदेशान्वये मान्यता दिलेली आहे. वरील प्रमाणे

स्वच्छ सर्वेक्षण २०२० अंतर्गत जनजागृती करणेकामी काढण्यात आलेल्या अगाऊ र.रु.१,६०,०००/- मधुन र.रु.१,६०,०००/- खर्च झालेला असुन र.रु. निरंक शिल्लक आहेत. तसेच सर्व क्षेत्रीय कार्यालय यांनी खर्चाची मुळ बिले सादर केली असुन ती प्रकरणी समाविष्ट करण्यात आलेली असल्याने स्वच्छ सर्वेक्षण २०२० अंतर्गत जनजागृती करणेकामी आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे नावे काढण्यात आलेल्या र.रु.१,६०,०००/- (अक्षरी रु.एक लाख साठ हजार फक्त) इतक्या रकमेचे झालेल्या खर्चाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७१५३ विषय क्रमांक – ४
दिनांक – १०/०६/२०२० विभाग – ड क्षेत्रिय, विद्युत
सुचक – मा. राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.डक्षे/कावि/जा/६०/२०२०, दि.०५/०६/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

राज्य शासनाने कोरोना विषाणुचा (कोविड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासुन लागु करून खंड २, ३ व ४ मधिल तरतुदी नुसार अधिसुचना निर्गमित केलेल्या आहेत त्या अनुषंघाने मा. विभागिय आयुक्त पुणे यांनी कोरोना संसर्गजन्य साथरोगास प्रतिबंध करणेच्या उपायोजना करणेसाठी आढावा बैठक घेतली होती. सदर बैठकीमध्ये पिंपरी चिंचवड शहरामधुन पर्यटन अथवा कामानिमित्त परदेशी जावुन आलेले नागरीक व पिंपरी चिंचवड शहरामध्ये कामानिमित्त किंवा नातेवाईकांकडे आलेले परदेशी नागरीक यांना १४ दिवस देखरेखीखाली (Home Quarantine) करणेकामी सुचना दिलेल्या आहेत त्यासाठी बालेवाडी क्रिडा संकुलामधील वसतीगृहाच्या ३ इमारती ( सी, डी१ व डी२) या ताव्यात घेण्यात आलेल्या आहेत तसेच उर्वरीत २ इमारती (ए,बी) त्वरीत ताब्यात घेणेत आलेल्या आहेत व तेथे COVID CARE CENTERE (CCC) स्थापण केलेले आहे. सदर ठिकाणी देखरेखीखाली (Home Quarantine) लोकांना ठेवणेत आलेले आहे. तथापि दिवसा व रात्रीच्या वेळेस लाईट गेल्यामुळे मोठ्या प्रमाणात नागरीकांची गैरसोय होत आहे त्यामुळे सदर ठिकाणी जनरेटरची सोय करणेत यावी तसेच विद्युत व्यावस्था व त्या अनुषांधीक कामकाजा करीता २४ तास वायरमन कर्मचारी त्वरीत नेमणुक करणेत यावी अशी मागणी मा.सहाय्यक आयुक्त श्री.सुनिल आलमलेकर, पिपरी चिंचवड महानगरपालिका यांनी पत्र क्र.आप/१/कावि/२८८/ २०२० दिनांक १२/५/२०२० चे पत्रान्वये करणेत आलेली आहे. सद्यस्थितीत ड प्रभागांतर्गत मनपाचा १ वायरमन कार्यरत आहे. त्यामुळे बालेवाडी क्रिडा संकुलामधील विद्युत व्यावस्था व त्या अनुषांधीक कामकाजा करीता २४ तास ठेकेदारी पध्दतीने वायरमन नेमणुक करणे आवश्यक आहे. सदर ठिकाणी विद्युत पुरवठा करणेकामी एक्सप्रेस फिडर आहे. सदर ठिकाणी सहाय्यक आयुक्त श्री.सुनिल आलमलेकर, पिंपरी चिंचवड महानगर पालिका यांचेशी मा. कार्यकारी अभियंता (वि.) ड क्षेत्रिय कार्यालय झालेल्या दुरध्वनी वरील चर्चेनुसार तात्पुरत्या स्वरूपात २ इमारतींसाठी ६२.५ केव्हीए चा जनरेटर बसवावा लागेल त्याचा प्रति दिन (२४ तासा) साठीचा खर्च पीडब्लुडी दर सुची (सन-२०८-१९) नुसार र.रू.१०,१०३/- तसेच अकुशल कर्मचारी यांचे किमान वेतन प्रती महीना र.रू.२२,८३०/- असे आहे. सदर

साठी टेकेदारी पध्दतीने ३पाळ्यांमध्ये कामगार नेमणुक करणे. सद्य स्थितीत अंदाजे २ महीने करीता सदर व्यवस्था कार्यान्वीत ठेवणे करीता एकुण र.रू.६,५१,८४०/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च करणेसाठी ड क्षेत्रिय कार्यालयाकडे सध्या कोणत्याही प्रकारची निविदा चालु अथवा प्रस्तावित नाही. परंतु अशा प्रकारचे काम गत वर्षि मे. मोरया मंडप डेकोरेटर्स निविदा नोटीस क्र.२/१६ २०१९-२० चे कडील १.६% कमी या दराने करून घेण्यात आलेले आहे. सदरचे काम तातडीने करणे आवश्यक आहे. सबब सदरचे काम मे.मोरया मंडप डेकोरेटर्स याचे कडुन थेट पध्दतीने करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७१५४ विषय क्रमांक – ५

दिनांक – १०/०६/२०२० विभाग – पाणीपुरवठा

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.शितल शिंदे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.पापु/६/कावि/२४०/२०२०, दि.०४/०६/२०२०

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.15/6/2019-20 अन्वये अशुद्ध जलउपसा केंद्र रावेत येथिल टप्पा क्र.१ ते ४ योजनेअंतर्गत विद्युत मोटर्सची दुरुस्ती व रिवायंडींग वार्षिक पध्दतीने करणेकामी मे.एक्सेल इलेक्ट्रीकल्स नि.र.रू.43,79,984/- (अक्षरी र.रु. त्रेचाळीस लाख एकोणऐंशी हजार नऊशे चौ-याऐंशी फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.43,79,984/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.43,79,984/- पेक्षा 12.6% कमी म्हणजेच र.रु.38,28,106/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.0/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- = एकुण र.रु.38,28,106/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७१५५ विषय क्रमांक – ६

दिनांक – १०/०६/२०२० विभाग – भूमि आणि जिंदगी

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.भुजि/८/कावि/१०५/२०२०, दि.०३/०६/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिं.चि.मनपाच्या पिंपरी मार्केट मधील गाळा क्र.३९ व ४० हे दोन गाळे कृषी उत्पन्न बाजार समितीस दि.२१/०८/१९९० ला ताब्यात देणेत आलेले आहेत. त्यांनी आज अखेर पर्यंतचे उप संचालक नगररचना यांनी ठरविलेल्या भाडे दराने संपुर्ण थकबाकीसह रक्कम भरलेली आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीने त्यांचे दि.२०/१२/२०१९ चे अर्जान्वये सदरचे दोन्ही गाळे पुढील १०

वर्षासाठी लिजने मागणी केलेली आहे. त्या अनुषंगाने भुमि आणि जिंदगी विभागाकडील पत्र क्र.भुजि/ ८/कावि/२/२०२० दि.२०/०१/२०२० अन्वये कृषी उत्पन्न बाजार समितीला मा.उप संचालक नगररचना यांजकडून प्राप्त १० वर्षाचे भाडे नुतनीकरण करार करणेकामी आकारणेत येणारी एकरकमी र.रु.१०,०३,५३६/- (अक्षरी र.रु. दहा लाख तीन हजार पाचशे छत्तीस फक्त) मान्य असलेबाबत पत्र देणेत आले होते. सदरचे १० वर्षासाठी लिजचे एकरकमी भाडे मान्य असलेबाबत कृषी उत्पन्न बाजार समितीने दि.०६/०२/२०२० चे पत्रान्वये कळविले आहे. तरी मा.उप संचालक नगररचना यांचे दरानुसार व नियमानुसार एक रकमी भाडे आकारुन १० वर्षासाठी पिंपरी मार्केट मधील गाळा क्र.३९ व ४० लिजने देणे बाबतचा विषय मा.स्थायी समितीच्या मान्यतेकामी सादर करणे आवश्यक आहे.

गाळ्याचे वर्णन- गाळा क्र. ३९ – १०८ चौ. फुट
गाळा क्र.४०- १०८ चौ. फुट
एकुण – २१६ चौ. फुट

सबब पिंपरी मार्केट मधील गाळा क्र.३९ व ४० कृषी उत्पन्न बाजार समितीला मा.उप संचालक नगररचना यांनी ठरवून दिलेली लिजची एकरकमी र.रु.१०,०३,५३६/- (अक्षरी र.रु.दहा लाख तीन हजार पाचशे छत्तीस फक्त) १० वर्षासाठी आकारून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७९ “ब” नुसार मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ७१५६ विषय क्रमांक – ७
दिनांक – १०/०६/२०२० विभाग – क क्षेत्रीय स्थापत्य
सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.कक्षेका/स्था/८२/२०२०, दि.१०/०६/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क-क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील गवळी माथा जवळील एम.आय.डी.सी. ओपन स्पेस क्र.29 या भुखंडावरील बालनगरी इमारतीमध्ये तात्पुरत्या स्वरूपाचे “कोरोना”(COVID-19)केअर सेंटर उभारण्याचे नियोजन करणेत आलेले आहे. उपरोक्त विषयांकित काम करणेसाठी प्रकल्प आराखडा तयार करणे व अनुषंगिक कामे करणे आवश्यक आहे. त्यास अनुसरून या कामांचे नियोजन, संकल्प चित्रे, प्रकल्प आराखडे, पुर्वगणनपत्रक, निविदा संच तयार करणे तसेच कामावर देखरेख करणे इ.निविदा पुर्व व निविदा पश्चात कामासाठी तज्ञ वास्तुविषारद यांची नेमणुक करणे आवश्यक आहे. “कोरोना” (COVID-19) या रोगाविरूध्दच्या लढाईमध्ये योगदान देणेच्या दृष्ट्रीकेनातून उपरोक्त विषयांकित कामासाठी आवश्यक निविदा पुर्व व निविदा पश्चात आर्किटेक्चरल कामे फक्त रक्कम रू.1/-

एवढा मोबदला घेऊन करणेस तयार असलेबाबतचे पत्र मे.शशी प्रभू आणि असो. यांनी दि. 8 जून 2020 रोजी मनपास दिलेले आहे. सबब, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या बालनगरी इमारतीमध्ये “कोरोना”(COVID-19) केअर सेंटर उभारणे व अनुषंगिक कामे करणे कामाच्या निविदा पुर्व व निविदा पश्चात आर्किटेक्चरल कामासाठी मे.शशी प्रभू आणि असोसिएट्स यांची तज्ञ वास्तुविषारद म्हणून नेमणूक करणेस तसेच सदरचे कामापोटी एकूण रक्कम रू. 1/-(र.रू.एक फक्त) एवढी फी सर्व करांसहित अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७१५७ विषय क्रमांक – ८
दिनांक – १०/०६/२०२० विभाग – माध्यमिक शिक्षण
सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे
संदर्भ – मा.अति.आयुक्त (१) यांचे पत्र क्र.माध्यमिक/४/कावि/२८१/२०२०, दि.०८/०६/२०२०

मा.अति.आयुक्त (१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

सध्या संपूर्ण देशामध्ये तसेच पिं. चिं. मनपा हद्दीमध्ये कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढत आहे. महाराष्ट्र शासन व मनपा मार्फत सदरील साथ रोगाचा प्रसार रोखणेकामी वेगवेगळ्या उपाययोजना राबविल्या जात आहेत. त्याचाच एक भाग व खबरदारीचा उपाय, म्हणुनप्राथमिक व माध्यमिक विद्यार्थ्यांनी एकत्र येऊ नये, Social distancing चे काटेकोर पालन व्हावे, म्हणून मनपा हद्दतील सर्व खाजगी व सरकारी शाळा बंद ठेवाव्या लागत आहेत. त्याकामी मनपाचे प्राथमिक शिक्षण विभागाचे मराठी, इंग्रजी व सेमी इंग्रजी, हिंदी व उर्दू.माध्यम. तसेच माध्यमिक शिक्षण विभागाचे उर्दू, मराठी व सेमी इंग्रजी माध्यमांकरीता चार FM broadcasting stations उभारणेचे नियोजन आहे. त्याकामी भारत सरकारचे Information & Broadcasting मंत्रालयाकडे forms सादर करणेसाठी प्रती frequency रक्कम रु. 2500/- प्रमाणे एकूण रक्कम रुपये 10,000/- अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७१५८ विषय क्रमांक – ९
दिनांक – १०/०६/२०२०
सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.राहुल कलाटे
संदर्भ – मा.शितल शिंदे, मा.राहुल कलाटे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड शहरातील विविध गृहप्रकल्प / सोसायट्यांमध्ये राहणा-या नागरिकांना शेतक-यांमार्फत जागेवर थेट भाजीपाला व फळे उपलब्ध होणे शक्य आहे व त्याकरिता इर्जिक ग्रुप, पिंपरी चिंचवड ही स्वयंसेवी संस्था स्वेच्छेने काम करणार असून इर्जिक ग्रुप गृहप्रकल्प / सोसायट्यांचे चेअरमन व महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने सदर संकल्पना प्रत्यक्षात काम करणार आहे. त्याकरिता शेतकरी थेट गृहप्रकल्प / सोसायट्यांचे चेअरमनशी संपर्क साधणार असून, इर्जिक ग्रुप यामध्ये समन्वयकाचे काम करणार आहे. महापालिकेने सदर कामासाठी मान्यतेचे पास देणे व याबाबतच्या मिटींग आयोजित करणे

अपेक्षीत आहे. याकरिता कोणताही खर्च येणार नाही. तरी वरीलप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७१५९ विषय क्रमांक – १०

दिनांक – १०/०६/२०२०

सुचक – मा. राहुल कलाटे अनुमोदक – मा. शितल शिंदे

संदर्भ – मा.राहुल कलाटे, मा.शितल शिंदे यांचा प्रस्ताव –

शिवाजी चौक काळेवाडी हा शिवसृष्टी संकल्पनेनुसार विकसीत करण्याचे कामासाठी सल्लागार म्हणून सृष्टी डिझायनर (गिरीष चिद्दरवार) यांची नेमणूक करण्यास व नियमानुसार त्यांना फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/३/कावि/५७६/२०२०
दिनांक – १०/०६/२०२०

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

**प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.**